**<u>सेशन केस नं.२३/१६</u>**
**<u>सा.क्र.३ निशाण क्र.१६</u>**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— उत्सुक वडिलांचे नांव :— सुभाष गांवकर,
वय सुमारे :— ३८ वर्षे व्यवसाय :— ड्रायव्हर,
रहाणार:—ए.टी.स्टॅन्ड नजीक, मालवण, तालुका :—मालवण,
जिल्हा:—सिंधुदुर्ग.

........................

**<u>अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.एस.के. तायशेटये सरतपासणी</u>**

दि.२८/११/२०१४ रोजी सायंकाळी सु. ५.४५ वाजता मी मालवण बाजरपेठेकडून माझे घराकडे परत येत होतो. माझे घराचे रस्त्यावर भरड नाका आहे. जेव्हा मी भरड नाक्यावर पोचलो तेव्हा तेथे लोकं जमलेली दिसली, तसेच आरडाओरडा होत होता. म्हणून मी तेथे पाहणेस गेलो. मी पाहिले की, आरोपी राजेश पारकर, साई पारकर आणि अन्य एक अनोळखी व्यक्ती राजेश कामतेकर याला मारहाण करत होते. ते राजेश कामतेकरला शिवीगाळही करत होते. त्यांचेमध्ये मी सोडवणूक केली आणि त्यांच्यापासून राजेश कामतेकरला बाजूला केले. त्यानंतर राजेश पारकर, साई पारकर आणि अन्य अनोळखी व्यक्ती मोटारसायकलवर ट्रीपलसीट बसून गेले. तिस—या व्यक्तीचे नाव मला समजून आले नाही. मला आरोपी दाखविल्यास मी ओळखेन. कोर्टासमोर असलेले तीन आरोपी तेच आहेत.

**उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. व्हि. पी.चिंदरकर यांचा**

२. मी चारचाकी वाहन चालवतो. मी ड्रायव्हर म्हणून मला बोलाविल्यास कोणत्याही वाहनावर काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, राजेश कामतेकर हे माझे मित्र आहेत. ते माझे वाडीत राहतात. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.१ संतोष कांदळकर यांची पत्नी म्हणजेच नगरसेविका श्रीमती कांदळकर आमच्याच वाडीत राहतात. हे म्हणणे खरे आहे की, मी राजेश कामतेकरला गेली १५ ते २० वर्षे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, राजेश कामतेकर याचे हॉटेल आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजेश कामतेकर यांचे हॉटेलमध्ये माझे वारंवार जाणे असते.

३. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/११/२०१४ रोजी मी मालवणचे बाहेर वाहनाने गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनेसंदर्भात मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/११/२०१४ रोजी बाजारपेठकडून एस.टी. स्टॅन्डकडे येणारा रस्ता हा गटाराच्या बांधकामामुळे बंद होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/११/२०१४ रोजी मी मोटारसायकलने बाजारपेठेकडून घराकडे परत जात होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे मोटार सायकलचे वर्णन आणि तिचे कागदपत्रं मी पोलिसांना दिलेले नाही, कारण त्या दिवशी माझेकडे मोटारसायकल नव्हती.

४. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगतो की, *''दि. २८/११/२०१४ रोजी सायंकाळी सु. ५.४५ वाजता मी मालवण बाजरपेठेकडून माझे घराकडे परत येत होतो. माझे घराचे रस्त्यावर भरड नाका आहे. जेव्हा मी भरड नाक्यावर पोचलो तेव्हा तेथे लोकं जमलेली*

*दिसली, तसेच आरडाओरडा होत होता. म्हणून मी तेथे पाहणेस गेलो. मी पाहिले की, आरोपी राजेश पारकर, साई पारकर आणि अन्य एक अनोळखी व्यक्ती राजेश कामतेकर याला मारहाण करत होते. ते राजेश कामतेकरला शिवीगाळही करत होते. त्यांचेमध्ये मी सोडवणूक केली आणि त्यांच्यापासून राजेश कामतेकरला बाजूला केले. त्यानंतर राजेश पारकर, साई पारकर आणि अन्य अनोळखी व्यक्ती मोटारसायकलवर ट्रीपलसीट बसून गेले.''*

५. हे म्हणणे खरे नाही की, राजेश कामतेकर याच्यावर हल्ला करणा—या व्यक्ती म्हणून मी खोटेपणाने आरोपींना ओळखले आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिस—या अनोळखी व्यक्तीला ओळखणेसाठी पोलिसांनी मला बोलाविले नव्हते.

६. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०/११/२०१४ रोजी मी पोलिसांना भेटलेलो नाही. पोलिसांनी माझा त्या दिवशी जबाब घेतला. दि.२८/११/२०१४ आणि २९/११/२०१४ रोजी मी मालवणमध्येच होतो. असे घडले नाही की, माझा जबाब नोंदविणेसाठी पोलिसांनी मला लेखी पत्र देवून बोलाविले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझेकडे कोणतीही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे ड्रायव्हरचे व्यवसायामुळे मी अनेकवेळा कोर्टात आलेलो आहे.

७. पोलिसांनी माझा जबाब कागदावर नोंदवून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, माझे टिपणामधील माझे टिपण संगणकावर टाईप केले असे नमूद केलेले आहे ते चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, भरड नाक्यावर दक्षिण बाजूस असलेल्या इमारतींची सावली भरड नाक्यावरील

रस्त्यावर पसरलेली असते. हे म्हणणे खरे नाही की, सावलीमुळे त्या ठिकाणी सायंकाळी ५.४५ वाजता रस्त्यावर काही दिसत नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेचा साक्षीदार नसल्याने आरोपींच्या कपडयांचे वर्णन आणि त्यांच्या मोटारसायकलचे वर्णन पोलिसांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजेश कामतेकरच्या मोटारसायकलचे वर्णन मी पोलिसांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजेश कामतेकर आणि पोलिस यांच्या सांगणेवरून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री.ए.एस. डिंगणकर यांचा**

आरोपी क्र.१ व २ यांचेतर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्विकारला.

फेरतपास नाही.

साक्षीदार यास जबानी समक्ष वाचून दाखविली,
त्याने ती बरोबर असल्याचे मान्य व कबुल केले.

सही/—
दिनांक—१८/०१/२०२० (पी.आर.कदम)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.